Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal

February 2020 Special Issue -245




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
M.S.G. Arts, Science & Commerce
College, Malegaon Camp,
Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIAT

RESEARCHJOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)

| | | | |
|---|---|---|---|
| 28 | मैत्रेयी पुष्पा की कहानियों में चित्रित नारी पात्र : गोमा हंसती है के सन्दर्भ में | प्रा. धोंडिबा भुरे | 128 |
| 29 | वाल्मिकि रामायण और राम के स्वरूप की स्थापना | सुमन रानी, प्रो. मन्जुनाथ अंबिग | 135 |
| 30 | 'पद्मावत' की भाषा विधान | डॉ. वसुंधरा उपाध्याय | 146 |
| 31 | गांधीजी और स्वावलंबन | डॉ. मधुलता व्यास | 151 |
| 32 | 'आज बाजार बंद है' उपन्यास का मूल्यांकन | डॉ. बळीराम भुक्तरे | 155 |
| 33 | अब्दुल बिस्मिल्लाह का उपन्यास साहित्य (समर शेष है और मुखड़ा क्या देखे के संदर्भ में) | डॉ. अशोक तायडे | 159 |
| 34 | विश्वंभरनाथ शर्मा 'कौशिक' का हिंदी उपन्यासों में योगदान | डॉ. अरुण घोगरे | 162 |
| 35 | वेद पाल कृत 'सखी री मोहे मिल गये मेरे राम' | डॉ. सुनिता शर्मा | 164 |
| 36 | प्रभा खेतान के 'छिन्नमस्ता' उपन्यास मे नारी मुक्ति का स्वर | डॉ. संजय गडपायले | 170 |
| 37 | महादेवी वर्मा का साहित्यिक दृष्टिकोण | विप्रा राऊल | 174 |
| 38 | जयशंकर प्रसाद के उपन्यासों मे मानवतावाद | डॉ. अरुण घोगरे | 178 |
| 39 | खेमो मे बटता साहित्य और प्रसार मध्यम | डॉ. दशरथ वाघ | 180 |
| 40 | नागार्जुन के उपन्यासों मे शिक्षित स्त्री | डॉ. समीर सय्यद | 183 |
| | **मराठी विभाग** | | |
| 41 | आदिवासी समाजातील भगताचे स्थान | डॉ. अंजली मस्करेन्हस | 186 |
| 42 | आदिवासी संस्कृती : स्वरूप, विकास आणि समस्या | डॉ. भास्कर शेळके | 191 |
| 43 | संत कर्ममेळा यांच्या अभंग काव्याचे सामाजिक, वाङ्मयीन मूल्यमापन | डॉ. संदीप सांगळे | 194 |
| 44 | राजकीय परिवर्तनाचा विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 203 |
| 45 | नवीन राज्यनिर्मिती – प्रश्न प्रादेशिक असमतोलाचा, सर्वांगीण विकासाचा | डॉ. संजय पाटील | 209 |
| 46 | भारतीय साहित्यातील महात्मा गांधींचे विचारदर्शन | डॉ. अनिल भगत | 215 |
| 47 | विविध राजकीय पक्षांची निवडणूक विषयक कामगिरी | डॉ. अजय बोरकर | 222 |
| 48 | ग्रामीण नाटक | डॉ. रमाकांत कराड | 227 |
| 49 | लोकसंख्या आणि पर्यावरण संबंध | डॉ. नवनाथ शिंदे | 231 |
| 50 | मराठी काव्यातील सांस्कृतिक पर्यावरण | डॉ. ज्योती माने | 236 |
| 51 | जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. रामदास मुक्टे | 240 |
| 52 | अहिराणी भाषेतील बहिणाबाई शकुंतला पाटील- रोटवदकर यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास | डॉ. सचिन पाटील | 244 |
| 53 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील वास्तव | डॉ. अनिता सोनवणे | 250 |
| 54 | आदिमांच्या धर्म संकल्पना आणि देव-देवता | डॉ. अनिल गर्जे | 253 |
| 55 | पेशवेकालीन स्त्री गुलामगिरी | डॉ. लता आंदे | 257 |
| 56 | भंडारा जिल्ह्यातील कोसा वस्त्रोद्योगाचे चिकित्सक अध्ययन | डॉ. सौ. अनिता दाणी | 263 |
| 57 | लाल लजपतराय यांची स्त्री विषयक भूमिका | डॉ. राजेंद्र रासकर | 266 |
| 58 | वादळातील दीपस्तंभ : संत वाङ्मय | डॉ. सौ. अलका इंदापवार | 271 |
| 59 | सण-उत्सव व कृषिजीवन | श्री एस. आर. साळुंखे | 276 |
| 60 | 'मुखवटा'मधील स्त्री चित्रण | डॉ. रेखा वडीखाये | 287 |
| 61 | नागरिकता संशोधन विधेयक, २०१९ | डॉ. प्रकाश पाटील | 292 |
| 62 | नंदुरबारच्या पाणीप्रश्नाची सोडवणूक | डॉ. उज्वला भिरुड (नेहेते) | 294 |
| 63 | उच्च शिक्षणातील मूल्यांकन व मान्यता परिषदेचे योगदान | श्री विपिन वैराट | 297 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 245
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
February 2020

# पेशवेकालीन स्त्री गुलामगिरी

डॉ. लता दिगंबर आंदे
शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड
कॉमर्स् कॉलेज,वाघोली.ता.कोरेगाव,
जि.सातारा. पिन कोड ४१५५२५
मो.नं. ९४२०८०८९६१
Email-andelata67@gmail.com

कोणत्याही राज्यातील स्त्रियांची स्थितीवरून त्या राज्याचे सर्वांगीन मुल्यमापन केले जाते. या नियमाला मराठा राज्यसुध्दा अपवाद नव्हते. मराठयांचा सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास समजावून घ्यावयाचा असेल तर मराठेकालीन सामाजिक व्यवस्थेअंतर्गत येणा–या गुलामगिरी या सामाजिक संस्थेचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. भारतातील एकूण लोकसंख्यापैकी ४० टक्के लोकसंख्या गुलामगिरी या संस्थेशी निगडित होती. आणि अप्रत्यक्षरित्या गुलामगिरी या संस्थेने मराठ्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये महत्वाचे योगदान दिलेले आहे. या अनुशंगानेच सदर शोध पेपरमध्ये पेषवेकालीन स्त्री गुलामगिरी वरती प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत पेपरसाठी ऐतिहाकि पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संदर्भ साधने –**

प्रस्तुतष्शोध पेपरसाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनाचा आधार घेण्यात आला आहे. गणेश चिमणाजी वाड यांनी संपादित केलेले " selection from the satara Rajas & Peshawas Diaries" ना.गो. चाफेकर यांचे 'पेशवाईच्या सावलीत', गो.स. सरदेसाई यांचे 'पेशवे दप्तर', डॉ.पी.ए. गवळी 'पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता' याचा संदर्भ साधन म्हणून उपयोग केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

पेशवेकालीन स्त्री गुलामगिरी अभ्यासणे.

**गुलामगिरीचा उल्लेख :**

ऋग्वेदामध्ये अशी अनेक सूक्ते आहेत. ज्यामध्ये दास आणि दासीची वर्णने सापडतात. हे दास म्हणजे एक प्रकारची संपत्ती. दास हा वर्ग असून दासांकडील संपत्ती आर्य हिंसकावून घेत असत. आणि जर गरज पडलीच तर आर्याच्या सुखाकरीतादास लोकांना नष्टही करण्यात येत असे. एका सुक्तात १०० दासांच्या दानाची मागणी केली आहे.[१] ऋग्वेदिक किंवा ज्याला वैदिक साहित्य म्हटले जाते.त्यामध्ये गुलामगिरीविषयी माहिती मिळते. आर्य भारतात आल्यावर 'लोखंडी किल्ल्यांनी' सुरक्षित अशा दास आणि दस्यू या आपल्या शत्रूशी लढले.या नाक नसलेल्या, चपटया ओठांच्या, 'लिंगपूजक' आणि निराळी भाषा बोलणा–या अशा या शत्रूबद्दल आर्यांना तिरस्काराखेरीज दुसरी कोणतीही भावना नव्हती. आर्य आणि त्यांच्या जिंकल्या गेलेल्या शत्रूंमध्ये शरीराच्या ठेवणीत आणि संस्कृतीमध्ये इतका फरक होता की कमी प्रकारच्या म्हणून मानलेल्या या संपूर्ण समाजाला प्रथम गुलाम या स्वरूपात स्वीकारणे हे सहज शक्य झाले. तेव्हापासून दास शब्दाचा अर्थ गुलाम असा झाला. विजय प्राप्त झाल्यामुळे विजेत्यांना पराभूतांच्या बायका रखेल्या म्हणून किंवा पत्नी म्हणून

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019)
Special Issue 245
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
February 2020

स्वीकारण्याचा हक्क प्राप्त झाला. त्यामुळे दास स्त्री अशी दासी ही विजेत्याची दासी म्हणजे गुलाम स्त्री बनली' २.

**अठराव्या शतकातील गुलामगिरी :**

अठराव्या शतकात महाराष्ट्रामध्ये पेशवाई सुरू होती, पण त्याच वेळेस इंग्रजांनी सर्व भारत आपल्या ताब्यात आणला होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात गुलामगिरी चांगल्या स्वरूपात अस्तित्वात होती. गुलामगिरीचा व्यापार आयात–निर्यात या स्वरूपात चालत असे. सरकारी दप्तरखान्यात गुलामगिरीच्या खरेदी–विक्रीची नोंद झाल्याचे पाहावयास मिळते. गुलामाची आयात पुढील राज्यात होत असे.सिंध,गोवा, दीव, दमण इ.[३]

**पेशवेकालीन गुलामगिरी :**

पेशवेकाळात काळात अनेक प्राचीन संस्थांचे पुनरूज्जीवन करण्यात आले. गुलामगिरीची निर्मिती ही त्यापैकी एक होय. पेशवेकाळात गुलामगिरीचे स्वरूप हिंदूधर्मशास्त्रात सांगितल्या प्रमाणेच होते, पण त्यात काही कालानुरूप बदल करून तिचे अस्तित्व त्या काळात समाज जीवनात होते व तिचे स्वरूप पुढीलप्रमाणे :–

**१.गुलामगिरी निर्मितीमागील कारणपरंपरा :**

पेशवेकाळात गुलामगिरी निर्मितीची अनेक कारणे आहेत ते पुढीलप्रमाणे :

**१.प्राचीन आणि मध्ययुगीन** काळात अशी पध्दत होती की, युध्दामध्ये जे कुणी पराभूत होतील .त्यांना पकडून गुलाम करणे. पेशवेकाळात युध्दात सापडलेल्या लोकांना प्रामुख्याने स्त्रीला गुलाम बनविण्याचे दाखले मिळतात. ''लढाईत कोणी पुरूषास धरीत नाहीत व गावगना लुटीचे समईही कोणी धरीत नाहीत. गावगना लुटीचे समयी बायकास अगर मुलीस मात्र धरून आणितात.परंतु सलुकाने देत नाहीत. बायका व मुली लुटून आणिल्या त्या कुणबीणी होतात. त्यास देशी आल्यावर विकतात''[४]

**२.कर्जबाजारीपणा:**

कर्जबाजारीपणा हे एक अत्यंत महत्वाचे गुलामगिरीचे कारण होते. ज्यावेळी घेतलेले कर्ज फेडण्याची ऐपत नसे.व कर्जाचा आकडा वाढतच असे.[५] त्यावेळेस व्याज व कर्ज यांच्या परतफेडीसाठी गुलामगिरीचा मार्ग स्वीकारावा लागत असे. भास्कर गोपाळ, माजी कमावीसदार, कसबे चाकण यांनी आपल्या कुळाकडून कर्जात 'मुरारभट कडूसकर यांजकडून बटीक कस १,किंमत रूपये ६० खरेदी केली' [६]

**३.'दुष्काळ' :**

'दुष्काळ' हे गुलामगिरीच्या निर्मितीमध्ये अत्यंत महत्वाचे कारण होते. भारत देश कृषीप्रधान असल्यामुळे सतत दुष्काळ पडत असे. या नैसर्गिक आपत्तीमुळे नेहमीच गुलामाच्या संख्येत वाढ होत असे. दुष्काळात लोक उपासमारीने मृत्यूमुखी पडत असत. उपासमारी व उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये काही वेळेस स्वत:च्या मुलाबाळांना विकण्याची पाळी येत असे. १७९० आणि १८०३ साली दक्षिणेत जो दुष्काळ पडला होता त्याचे वर्णन बानाजी यांनी केले आहे.

अशा प्रकारे दुष्काळ म्हणजे गुलामगिरीच्या व्यापाराला मदत करणारी एक प्रकारची पर्वणीच होती. पेशवेकाळात मोठ्या प्रमाणात गुलामांचा पुरवठा होत असे.शूद्र वगैरे नीच जातीचे मुलास दुष्काळात त्यांचे आई बाप विकतात.[७]

४. पेशवाईत बदअमल किंवा बदकर्मात सापडलेल्या स्त्रीस गुलाम केले जात असे, पण हा नियम सर्व जातीतील स्त्रियांसाठी लागू नव्हता. जर ती स्त्री शूद्र जातीतील असेल तरच तिला गुलाम केले जात असे. हे एक खास तत्कालीन गुलामगिरीचे वैशिष्ट्य होते.

५.तत्कालीन काळातील राजे, प्रधान, सरदार किंवा श्रीमंत माणूस आपल्या जवळच्या नातलगास किंवा आप्तास कुणबीण बक्षीस किंवा भेट म्हणून देत असे. तशी त्याकाळी पध्दती रूढ होती. या पध्दतीमुळे नक्कीच त्यावेळी गुलामाच्या संख्येत वाढ झाली असली पाहिजे.

६. स्त्रियांना फूस लावून पळवून नेऊन त्यांची विक्री केली जात असे. हा प्रकार कोकण प्रांतातील समुद्रकिना–यापाशी होत असे. आपणास गुलाम निर्मितीच्या पाठीमागची कारण परंपरा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१.युध्दात पराभूत झाल्याने होणारे गुलाम.
२.कर्जबाजारीपणात झालेले गुलाम.
३.दुष्काळात विकत घेतलेले गुलाम.
४.बदकर्म किंवा व्यभिचाराने झालेले गुलाम.
५.बक्षीस म्हणून झालेले गुलाम.

वरील सर्व प्रकारच्या गुलामांना पेशवेकाळात रूढार्थाने दास किंवा दासी म्हणून ज्या प्रचलित होत्या त्यांना 'कुणबिण'व 'पोरगे' असे म्हणत. कुणबिणी ही संज्ञा प्रामुख्याने घरकाम करणा–या स्त्री गुलामांना लाविली जात असे. बटीक या प्रामुख्याने स्त्री गुलामच असत; पण त्या वेश्याव्यवसाय किंवा व्यभिचार करणा–यांनाच म्हणत. पोरगे हे स्त्री वेशात करमणूक करणारे तरूण असत. [८]

**२.कुणबीणीची कामे:**

मराठेकाळात पुरूश गुलामापेक्षा स्त्री गुलामाची संख्या ही जास्त होती. स्त्री गुलामांना अनेक प्रकारची कामे करावी लागत असे. भारतीय गुलामगिरी ही घरगुती स्वरूपाची असल्याने गुलाम स्त्रियांना घर सारवणे, भांडी घासणे,कपडे धुणे,शेतीकाम करणे,गुराची चाकरी करणे, दळण– कांडण करणे, धणी सांगेल ते काम करणे, किल्ल्यावर दारू ओतण्याचे काम, किल्ल्यावर इमारतीचे काम करणे व एखाद्या धनी आपल्या इश्कासाठीही कुणबीण ठेवत असे. कुणबीणीची जात उच्च असेल तर ती खालच्या जातीच्या घरी राहत नसे. व तिची जात खालची जात असेल तर तिला तिच्या जातीप्रमाणे काम करावे लागत असे. [९]

मराठेकाळात छत्रपती, पेशवे,सरदार,साहुकार इ. लोक आपला बराच वेळ गुलाम स्त्रिच्या सहवासात घालवित असत. गुलाम स्त्रीबरोबर शारिरीक संबंध ठेवणे किंवा त्या गुलाम स्त्रीचा सुखोपभोग घेणे त्या काळी निषिध्द नव्हते. थोडक्यात आपल्या इच्छा पूर्ण करणे हेंही एक त्या काळी गुलाम स्त्रीचे कामच होते.

**३.गुलामगिरी ही सामाजिक संस्था :**

मराठेकाळात समाजात गुलामगिरी ही एक सामाजिक संस्था होती. युरापियन गुलामगिरी व्यापारी स्वरूपाची होती. भारतीय गुलामगिरी घरगुती स्वरूपाची होती. गुलाम स्त्रियांना कुणबीण,बटीक,दासी,पोरगी व पुरूष गुलामांना पोरगा म्हणत. दास असे शब्द समाजात प्रचलित होते. सामान्यता ब्राम्हण वर्ग व अस्पृश्य वर्ग वगळता कुणबीणी या सर्व जातीतील असत. कुणबीणींना बरदारापासून स्वयंपाक घरापर्यंत सर्व प्रकारची कामे देण्यात येत असल्यामुळे अशा कामाला अस्पृश्य वर्गातील स्त्री–पुरूष अपात्र मानण्यात येत असे. कारण यांच्या स्पर्शाने विटाळ अथवा संसर्गदोष होत असे. व्यवहारात मात्र अनेक अस्पृश्य वर्गातील स्त्रिया जात चोरून अथवा

इतर जातीच्या आहेत. असे खोटे सांगून बटक्या किंवा कुणबिणी बनत. आणि सवर्णाच्या घरातून कामे करीत, परंतु कधी कधी अशा कुणबिणींच्या अस्पृश्य जातीचा उलगडा होत असे. [१०]

४.भाग्यवान गुलाम :

या काळात काही स्त्री गुलामांची स्थिती चांगली असल्याचे अनेक उदा. आहेत. एका दासीचीं मुलगी विरूबाई हिने छत्रपती शाहूंची मर्जी संपादन करून त्यांच्या खासगी जीवनात व दरबारात आपले स्वतःचे असे एक विशिष्ट स्थान निर्माण केले होते. विरूबाई व छत्रपती शाहू यांचा संबंध कसा आला. विरूबाई दासी कन्या होती हे पुढील उता–यावरून सिध्द होते. बादशाहाने 'लग्ने जाहली नवरी पहण्यास आणावी' सांगितले तेव्हा मराठी विचार नवरी नेहणे ठीक नाही. म्हणून येसूबाईसाहेब याणी बेगमचे विचारे याजकडील आंदणी दासीची कन्या होती. चांगली पाहून ती व्याविशी करून तिजला वस्त्रे, जवाहिर, अलंकार देऊन महाराज त्यास व तिजला पाठवली.' [११]

५.जातीव्यवस्था आणि स्वातंत्र्य :

पेशवेकाळातील गुलामगिरीचे प्रामुख्याने वैशिष्ट्ये असे होते. गुलाम या प्रामुख्याने स्त्रिया असत. या स्त्रिया शूद्र जातीच्या असत. सोनार, प्रभू, कुणबी, धनगर, परीट, सुतार, माळी, कोळी, मराठा इत्यादी जातीतील असत. अतिशूद्र हे स्पर्श करण्यास निषिध्द असल्याने व त्यांच्या सावलीचाही विटाळ असल्याने त्यांना गुलाम बनविले जात नसे.

पेशवेकाळात गुलामास संपत्ती बाळगण्याचा अधिकार होता. काही वेळेस कुणबीण म्हातारी झाल्यास काम तिच्या हातून होत नसे. अशा वेळेस बदली स्त्रीस कुणबीण म्हणून देऊन स्वतःची सुटका करून घेता येत असे. किंवा काही वेळेस म्हाता–या झाल्या म्हणूनसुध्दा त्यांना सोडण्यात येत असे. गुलामगिरी ही प्रामुख्याने स्त्रियांवरच लादली होती. त्याचबरोबर कुणबीणी, बटीक ह्या शूद्र जातीतीलच असत.

६.गुलामांचा व्यापार :

मराठेकाळात छत्रपती,पेशवे,सरदार,जहागिरदार,साहूकार,ब्राम्हण,परकीय व्यापारी,सरकारी अधिकारी यांच्याजवळ गुलाम असत. पेशवकाळात भिक्षूक,पुराणिक हे सुध्दा कुणबिण बाळगीत असत. सैन्यातील खालचा अधिकारी कुणबिण किंवा बटीक बाळगीत असत. पेशवाई सरकारच्या मालकीच्या कुणबिणी जास्त असत. पेशव्याच्या खाजगीकडे १९७ कुणबिणी असल्याचा पुरावा सापडतो. पेशवेकाळात गुलामाचा व्यापार चालत असे. परंतु नियमितपणे गुलामांच्या व्यापाराची बाजारपेठ होतीच असे म्हणता येत नाही. पेशवेकाळात गुलामाचा व्यापार चारण व बंजारी लोक करीत असत. हेच प्रमुख व्यापारी होते. पेशवाईत गुलामांचा व्यापार समुद्रकिनारी म्हणजे कोकण प्रांतात चालत असे. कोकणात हा व्यापार चारण करीत असत. निरनिराळ्या भागातून गुलामाची खरेदी करून आणीत असत व त्यांची विक्री करीत असत. इ.स. १७८० मध्ये चारणांनी मुस्लिम गुलामांचे व्यापारी, लालखान,मल्लिकखान आणि परीखान यांच्याकडून काही कुणबिणीची विक्री पेण बंदरात होत असे. याचा सुगावा सरकारी अधिका–यांना लागल्याने लालखान व त्यांच्या साथीदारांना पेशव्यांनी दरबारात हजर राहण्याविषयी समज दिली आहे.[१२]

अशाप्रकारे पेशवाईत गुलामांची किंमत २० रूपयापासून २०० रूपयांपर्यंत असे.या काळात गुलामांच्या व्यापारावर सरकार जकात घेत असे.व त्यापासून सरकारला बरेच उत्पन्न मिळत असे. गुलामाची जी विक्री होत असे.त्याच्यावर जकात घ्यावी अशा पकारच्या आज्ञा निरनिराळ्य प्रांताच्या अधिका–यांना दिलेल्या आपणास दिसतात.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019) | Special Issue 245 | February 2020
Peer Reviewed-Referred & Indexed Journal

७.सामाजिक:

कुणबिणीला सणावाराला पोस्त, दिवाळीला ओवाळणी,नेसायला चांगल्या प्रकारची लुगडी, पायात वाहणा धन्याकडून मिळत.[१३] कुणबिणी देवास नवसही बोलत असल्याचे संदर्भ मिळतात. कमळी कुणबिणीच्या मुलास बरे वाटत नव्हते म्हणून खंडेरायास नवस केला व तो फेडण्यासाठी सामान उलफा ५० बकरी सर ५,तेल पावशेर ,जेजुरीच्या खंडेरायास दिले व नवस पूर्ण केला.

८.गुलामांना मिळणारी वागणूक व राहणीमान:

गुलामांना मिळणरी वागणूक व त्यांचे जीवनमान हे त्यांच्या मालकांवर अवलंबून असे. गुलामाच्या मालकाकडून प्रत्येक शुभप्रसंगी, लग्नसमारंभात, सणसुदीला गुलामांना चांगली वागणूक मिळत असे.मालक श्रीमंत आणि उदार असेल तर बक्षीस म्हणून रोख रक्कम व भेटीदाखल वस्तू देत असे. गुलामांना स्वतःचा मालक फक्त खरेदी –विक्री,बक्षीस इत्यादी माध्यमांतून बदलता येत असे. कारण गुलाम ही आश्रयदात्यांची व मालकांची संपूर्णपणे खाजगी मालमत्ता आहे. असे समजले जात असे. खरेदी –विक्री व बक्षीस यामध्ये मालकाचे मत अंतिम असल्याने गुलामांना काही वेळेस वाईट मालकांच्या हाती पडावे लागे व मग त्यांच्या दुर्दशेला कुणीही जबाबदार नसे. गुलाम मेल्यास वारस धनी होत असे..

अशाप्रकारे या काळात अस्पृश्यापेक्षा गुलामाची स्थिती चांगली असल्याचे दिसून येते. गुलाम जवळ बाळगल्याने समाजात प्रतिष्ठेचे लक्षण समजल्या जात होते. पेशवेकाळात गुलामगिरी हे एक सामाजिक जीवनाचे अविभाज्य अंग होते. या काळात पेशव्यांनी अतिशूद्रांना गुलाम बनविले नाही. अतिशूद्रांना गुलाम बनविले असते तर त्यांची स्थिती सुधारली असती. आज गुलामगिरीची प्रथा कायद्याने बंद करण्यात आली आहे.

८.निष्कर्ष :

१. गुलामगिरी हे मराठेकालीन समाजव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट होते.
२. मराठेकालीन गुलामगिरी ही घरगुती स्वरूपाची होती.
३. गुलामगिरी या संस्थेचा अभ्यास करावयाचा झाल्यास आधुनिक काळाचा मापदंड लावून चालत नाही तर त्या त्या काळात जावून करावा लागतो.
४. गुलामगिरीवरती जातीव्यवस्थेचा जबरदस्त पगडा असल्याचे दिसते.
५. गुलामगिरीमध्ये ९० ते ९५ टक्के स्त्रिया गुलाम होत्या हे त्यांच्या संख्येवरून दिसून येते.
६. मराठेकालीन समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिल्याचे दिसून येते.
७. पेशवेकाळात शूद्र जातीतीलच स्त्रिया गुलाम असल्याचे दिसून येते.
८. या काळातील गुलाम बदली गुलाम देऊन सुटका करून घेतल्याचे दिसून येते.
९. या काळात गुलामांची खरेदी व विक्री करीत असल्याचे दिसून येते.

१०. संदर्भ साधने :

१. डॉ.गवळी पी.ए.'मराठयांचा इतिहास',आनंद प्रकाशन,जयसिंगपूरा औरंगाबाद,१जाने–२०१८ पृ.१७७
२. चनाना देवराज 'प्राचीन भारतातील गुलामगिरी' पृ.७
३. डॉ.गवळी पी.ए. 'पेशवेकालीन महाराश्ट्र', कैलास पब्लिकेशन औरंगाबाद,आ. १,१८ मे २०००,पृ. ३१८
४. पेशवे दप्तर, खंड–४२,पृ.३३,३४

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 245
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
February 2020

५. डॉ.गवळी पी.ए.'पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता' आनंद प्रकाशन,औरंगाबाद,आ. १,१४ऑक्टो–२०१६
६. पृ.५३
७. चाफेकर ना.गो. 'पेशवाईच्या सावलीत' आर्यसंस्कृती मुद्रनालय,पुणे, १९३७, पृ.१८५
८. पेशवेकालीन रोजनिशी खंड–७,नोंद–७४६,डॉ.गवळी पी.ए.'पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता'पृ. ५३
९. Banaji D.R. "Slavari in British India"p-4, डॉ.गवळी पी.ए.'पेशवेकालीन महाराष्ट्र' पृ.३२०
१०.भावे वा.कृ. 'पेशवेकालीन महाराष्ट्र' वरदा प्रकाशन पुणे, आ. २, १९९८, पृ. २४०
११.वाड जी.सी, मराठे के.बी. वाड खंड–८,जगदहितेच्छ प्रकाशन ,पुणे. १९११,पत्र क्र.११२५
१२.भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक ६२–१–४ ,१९८३–८४,पृ.१३५
१३.साने कृ.ना. 'थोरले शाहूंचे चरित्र' पृ.५,७ ;तळटीप
१४.डॉ.गवळी पी.ए. ' पेशवेकालीन महाराष्ट्र' पृ. ३३०
१५.वाड.जी.सी, पारसनीस डी.बी. वाड डायरी खंड–२, इंदूप्रकाश प्रकाशन,पुणे,१९०६,पत्र क्र.१७८